सं.फौ.ख.क्र.५१६/२०१३
किसनवीर कारखाना वि. संदीप
नि.क्र.४६ पुढे सुरु.

**<u>फिर्यादीपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु.</u> <u>आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एम.एस. बागवान</u> –**

३. मी फिर्यादी कारखान्यात लिगल इंचार्ज म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कारखान्यात शेती विभाग, वाहतुक कामगार कंत्राटी विभाग, लेखा विभाग, अभियांत्रीकी विभाग, उत्पादन विभाग असे वेगवेगळे विभाग आहेत. प्रत्येक विभागाचे कामकाज वेगवेगळे आहे. उस तोडणी व वाहतुकीचे काम उस तोडणी विभाग तसेच शेती विभागात पाहिल्या जाते. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या विभागांशी संबंधीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, उस तोडणी व वाहतुक विभागातील व्यवहारांच्या नोंदी लेखा विभागात असतात. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.५५ वरील करारनामा करतेवेळी मी तेथे हजर नव्हतो.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या साक्षशपथपत्रात आरोपीने ट्रकने अथवा ट्रॅक्टरने वाहतुक केल्याचे तसेच तशी वाहतुक कोणत्या तारखेला व किती टन उसाची वाहतुक केली याबाबत नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने फिर्यादी संस्थेकडून किती तारखेला किती रक्कम अग्रीम उचल केली होती याबाबतचा उल्लेख माझ्या साक्षशपथपत्रात नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.५५ वरील करारनाम्यातील पान क्र.१ वर करारनामा करुन देणा–या व्यक्तिच्या नावाचा तसेच करारनाम्याच्या तारखेचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच करारनाम्याच्या पान क्र.४ वर देखील तारखेचा उल्लेख नाही.

५. मी माझे साक्ष शपथपत्र दाखल करण्यापूर्वी आरोपीशी फिर्यादी कारखान्याच्या झालेल्या व्यवहाराबाबतचे कागदपत्र पाहिलेली नाहीत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तो विभाग वेगळा आहे. आता मला नि.क्र.५६ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यात करारनामा लिहून देणार व लिहून घेणार म्हणून केवळ आरोपीच्या नावाचाच उल्लेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५६ मध्ये आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५६ वर तारीख नमूद नाही. हे म्हणणे खरे

आहे की, नि.क्र.५७ वरील कथीत संमतीपत्रावर कुण्याही साक्षीदाराची सही नाही तसेच आरोपी किती कालावधीकरीता काम करणार आहे याचा तपशील देखील त्यात उल्लेख केलेला नाही.

६. आरोपीने त्याचे वाहनातुन केलेल्या वाहतुकीचा कालावधी तसेच फिर्यादी संस्थेकडून उचल केलेली रक्कम याचा तपशील फिर्यादी कारखान्यात आहे. तसा तपशील प्रस्तुत प्रकरणात दाखल आहे. आता मला माझे साक्षशपथपत्रातील परिच्छेद क्र.२ मधील मजकूर 'फिर्यादी संस्थेकडून उचल म्हणून घेतलेली रक्कम रु.१,२९,६३६/– ही परतफेड केलेली नाही' वाचून दाखविण्यात आला. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तो बरोबर नाही. आरोपीने कोणत्या वाहनाने किती तारखेस किती टन उसाची वाहतुक केली याबाबतचे दस्त मी अभिलेखावर दाखल करु शकतो.

*प्रकरण पुढील तारखेपर्यंत तहकूब.*

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

वाई.
*स्वाक्षरी/-*

दि.०६.१२.२०२३
(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.२, वाई.